महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# कुसुमाग्रजांची साहित्यरत्ने ई-बुकरुपात!

24 Feb 2012, 0435 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

म. टा. प्रतिनिधी । मुंबई

ज्येष्ठ कवी, नाटककार, लेखक, कादंबरीकार वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांच्या सिद्धहस्त लेखणीतून प्रसवलेली नाटके, कविता, कादंबऱ्या, लेख आता ई-बुकच्या माध्यमातून वाचकांच्या भेटीला येत आहेत. येत्या २७ फेब्रुवारीला कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी साजऱ्या होणाऱ्या 'मराठी भाषा दिनी' कवी मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते नाशिकमध्ये या ई-बुकचे प्रकाशन होणार आहे. प्रकाशनानंतर लगेचच 'बुकगंगा डॉट कॉम' या संकेतस्थळावर कुसुमाग्रजांचे बहुतांशी साहित्य एका क्लिकवर उपलब्ध होईल.

|जीवनलहरी', 'विशाखा', 'समिधा' सारखे गाजलेले कवितासंग्रह, 'छोटे आणि मोठे मासे', 'प्रेम आणि मांजर' सारखे कथासंग्रह, 'वीज म्हणाली धरतीला', 'ययाति देवयानी' सारखी गाजलेली नाटके, 'जादूची होडी' आणि 'जाईचा कुंज' हे बालसाहित्य याशिवाय त्यांचे लेख, परीक्षणे, कादंबऱ्या, एकांकिका आदी विविध प्रकारच्या साहित्याचा खजिना खुला होणार आहे.

कुसुमाग्रजांच्या जन्मशताब्दी वर्षाची २७ फेब्रुवारीला सांगता होणार आहे. यानिमित्ताने नाशिकमध्ये कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे विविध कार्यक्रम आखण्यात आले आहेत. कुसुमाग्रजांच्या ई-बुकचे प्रकाशन हा त्याच कार्यक्रमाचा एक भाग असेल. सांगता सोहळ्याच्या दिवशी कुसुमाग्रज स्मारकापासून शोभायात्रा निघणार असून सायंकाळी पाच वाजता कालिदास कलामंदिर येथे आयोजित कार्यक्रमात मंगेश पाडगावकर, पालकमंत्री छगन भुजबळ, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, सारस्वत बँकेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ ठाकूर, प्रतिष्ठानचे अध्यक्ष जब्बार पटेल आदी मान्यवरांच्या उपस्थितीत ई-बुक सुरू करण्यात येणार आहे.